ePaper


# महाराष्ट्र क्रांती सेना पक्ष लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात, चार जागा लढविणार



| वर्ष - 7 । अंक - 291 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 8 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- फिरकीच्या जाळ्यात साहेब अडकले!
- धूम्रपान करत चाहत्यांशी गप्पा
- तलवार घेऊन कोण आंदोलन करते?
- नमो महासंमेलनाला परवानगी कशी?

## आमदार सुनील शेळके यांना सज्जड दम

# शरद पवार म्हणतात मला..!

### मावळात कार्यकर्त्यांना शेळकेंनी धमकावल्याचा आरोप

। लोणावळा । महाईन्यूज

**"सुनील शेळके, तू आमदार कुणामुळे झालास हे विसरु नकोस, तुला ज्यामुळे चिन्ह मिळालं, त्या अर्जावर खाली माझी सही आहे. मला शरद पवार म्हणतात, माझ्या वाट्याला कुणी गेलं, तर मी त्याला सोडत नाही" असा सज्जड दम ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी भरला आहे. अजित पवार समर्थक आमदार सुनीलअण्णा शेळके यांनी शरद पवारांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यकर्ता मेळाव्याला हजर न राहण्यासाठी काही नेत्यांना धमकवल्याचा आरोप आहे. त्यानंतर पवारांचा संताप झाल्याचं पाहायला मिळालं.**



"तू आमदार कुणामुळे झालास? तुझ्या सभेला इथे कोण आलं होतं? त्या तुझ्या पक्षाचा जुना अध्यक्ष कोण होता? चिन्हासाठी नेत्याची सही लागते, ती माझी आहे.

तुम्ही आज त्याच पक्षाच्या त्याच विभागातील कार्यकर्त्यांनी, जे तुम्हाला निवडून आणण्यासाठी तळागाळात राबले, घाम गळला, आज त्यांना तुम्ही दमदाटी करता? माझी विनंती आहे... एकदा दमदाटी केली.. आता बास.. पुन्हा असं काही केलं, तर शरद पवार म्हणतात मला... मी या रस्त्याने कधी जात नाही... पण या रस्त्याने जाण्याची स्थिती कुणी निर्माण केली.. तर सुनील शेळकेंनी.." असं शरद पवार म्हणाले.

## सुनील शेळके यांची प्रतिक्रिया काय?



शरद पवार साहेब यांच्याविषयी आजही आदर आहे, उद्याही राहील. त्यांनी असं वक्तव्य का केलं, त्याचं कारण आणि संदर्भ मला माहिती नाही. मी राष्ट्रवादीचा कार्यकर्ता म्हणून आजही आणि उद्याही अजित पवार यांच्यासोबत राहीन. शरद पवार यांच्यासोबत असलेले काही स्वयंघोषित नेते माझ्याबाबत वक्तव्य करत आहेत, मी कोणाला दमदाटी केल्याचं कोणी सिद्ध केलं तर मी जाहीर दिलगिरी व्यक्त करेन, अशी प्रतिक्रिया सुनील शेळके यांनी 'एबीपी माझा'शी बोलताना दिली. शरद पवार यांच्या उपस्थितीत होणाऱ्या मेळाव्याला हजर राहू नये यासाठी शेळकेंनी फोन करुन धमकावल्याचा आरोप झाला होता. त्यानंतर शरद पवारांची संतप्त प्रतिक्रया समोर आली आहे.

## काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?



"शरद पवार हे महाराष्ट्रातले मोठे नेते आहेत. ५५ वर्षे त्यांची राजकीय कारकीर्द आहे. त्यांच्यासारख्या इतक्या ज्येष्ठ नेत्याने सुनील शेळके या आमदारांना धमकी दिली असेल तर ते योग्य नाही. मी शरद पवारांना सल्ला देण्याइतका मोठा नाही. पण त्यांनी याचा पुनर्विचार केला पाहिजे. ते आज कुठल्या स्तराला आहेत. अशा प्रकारे ते आमदारांना धमक्या देऊ लागले तर त्यांचा स्तर खाली येईल. मला वाटत नाही की कुणी आमदार शरद पवारांना धमकी देईल. मी काही त्यांचं म्हणणं ऐकलेलं नाही, तुम्ही जे सांगत आहात त्यावर मी इतकीच प्रतिक्रिया देतो आहे की असं त्यांनी बोलणं योग्य नाही."

## आढळराव पाटलांसमोर राजकीय पेच!

### आयात उमेदवार नको : विलास लांडे समर्थकांचा पक्षाकडे आग्रह

। पुणे । महाईन्यूज ।

शिरूर लोकसभा निवडणुकीसाठी माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील इच्छुक असताना या जागेसाठी आयात उमेदवार नको, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बुधवारी मुंबईत झालेल्या बैठकीत केली. माजी आमदार विलास लांडे यांच्या नावाचा कार्यकर्त्यांनी आग्रह धरल्याने लोकसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जवळ आलेले शिवसेनेचे आढळराव यांच्यासमोर राजकीय पेच निर्माण झाला आहे. महायुतीच्या जागावाटपात शिरूर लोकसभा मतदारसंघ 'राष्ट्रवादी'कडे जाण्याची दाट शक्यता आहे. सन २०१९च्या निवडणुकीत 'राष्ट्रवादी'चे डॉ. अमोल कोल्हे यांनी शिवसेनेच्या आढळराव यांचा पराभव केला. आता राष्ट्रवादी (अजित पवार) महायुतीत सहभागी असून, कोल्हे यांनी शरद पवार यांची साथ सोडलेली नाही. या पार्श्वभूमीवर शिरूरमध्ये दोन 'राष्ट्रवादी'मध्ये लढत होण्याची शक्यता आहे.

## माजी आमदार विलास लांडे यांची गुगली...



दरम्यान, लांडे यांनी राजकीय विरोधक भाजपचे भोसरीचे आमदार महेश लांडगे यांना शिरूर लोकसेभेची घडाळ्याच्या चिन्हावर उमेदवारी मिळावी, अशी मागणी करून आढळराव यांना अप्रत्यक्ष विरोध दर्शविला आहे. लांडे आणि लांडगे यांचे मामा-भाचेजावयाचे नाते आहे. 'राष्ट्रवादी'च्या कार्यकर्त्यांनी त्यांना खो दिल्याची चर्चा आहे. राज्य सरकारने आढळरावांची नुकतीच राज्यमंत्रिपदाच्या दर्जाच्या 'म्हाडा, पुणे'च्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. महायुतीमधील राजकीय साठमारीत आढळरावांना 'म्हाडा'च्या अध्यक्षपदावर समाधान मानावे लागेल, अशी कुजबुज सध्या सुरू आहे.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत असलेले आढळराव गेल्या काही दिवसांमध्ये 'राष्ट्रवादी'च्या जवळ आले आहेत. आढळराव यांनी जुने मित्र मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासोबत मतदारसंघात दौरे; तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठकांचा सपाटा लावला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील बैठकीत विलास लांडे यांचे नाव समोर आल्याने आढळरावांच्या उमेदवारीवरून संभ्रम निर्माण झाला आहे.

# पुण्याचे 'अनुदानभरोसे' अंदाजपत्रक!

## 11 हजार 601 कोटींचा 'विक्रम'; 450 कोटींचे कर्ज प्रस्तावित

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**उत्पन्नप्राप्तीसाठी पारंपरिक आर्थिक स्रोतांवर अवलंबून असतानाही आणि मिळकतकरामध्ये कोणतीही वाढ केलेली नसताना केवळ मोठ्या प्रमाणावर शासकीय अनुदान मिळेल, ही शक्यता गृहीत धरून महापालिकेने ११ हजार ६०१ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर करण्याचा 'विक्रम' केला आहे. उत्पन्नवाढीसाठी कोणतीही ठोस उपाययोजना हाती घेण्यात आल्या नसतानाही गतवर्षीच्या अंदाजपत्रकाच्या तुलनेत आगामी वर्षाचे अंदाजपत्रक २०८६ कोटींनी फुगविण्यात आले आहे.**



अंदाजपत्रकात जमा बाजू दाखविण्यासाठी ४५० कोटींचे कर्ज घेण्याचेही प्रस्तावित आहे. एकुणात जमा बाजूमध्ये २० टक्के उत्पन्न अधांतरी धरण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ११ हजार कोटींचा टप्पा गाठल्यानंतरही अंदाजपत्रकाच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होणार आहे.महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीचे ११ हजार ६०१ कोटींचे अंदाजपत्रक गुरुवारी स्थायी समितीला सादर केले. या अंदाजपत्रकाची अंमलबजावणी एक एप्रिलपासून होणार आहे. मिळकतकरामध्ये कोणतीही वाढ अंदाजपत्रकात करण्यात आलेली नाही. मिळकतकर थकबाकी वसुली, थकबाकीदार निवासी मिळकतींचा लिलाव, कर आकारणी न झालेल्या मिळकतींना तिप्पट कर आकारणीबरोबरच शासकीय अनुदान यावरच आगामी वर्षात महापालिकेची आर्थिक भिस्त राहणार आहे. त्यामुळे उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ घालण्यासाठी महापालिकेला तारेवरची कसरत करावी लागणार आहे.आगामी आर्थिक वर्षात दोन हजार कोटींचे अनुदान मिळेल, अशी शक्यता अंदाजपत्रकात गृहीत धरण्यात आली आहे. वास्तवात गेल्या काही वर्षांपासून राज्य आणि केंद्र सरकारकडून अनुदान वेळेवर मिळत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. वस्तू आणि सेवाकरातून २५०१ कोटी रुपये मिळतील, असे नमूद करण्यात आले आहे. गेल्या वर्षातील दरमहा १९३ कोटी रुपयांमध्ये सरासरी आठ टक्के वाढ गृहीत धरून आगामी वर्षासाठी दरमहा २०८.४७ कोटी रुपये प्राप्त होतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. एक टक्का मुद्रांक शुल्क अधिभारातून पाचशे कोटी रुपये मिळण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मिळकतकरातून फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंत दोन हजार कोटींचे उत्पन्न महापालिकेला मिळाले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ते ३२६ कोटींनी जास्त आहे. मिळकतकराच्या उत्पन्नासाठी बिगरनिवासी, वापरात बदल झालेल्या, अनधिकृत बिगरनिवासी मिळकती, अनधिकृत क्रीडा संकुल, हॉटेल यांचा शोध घेतला जाणार आहे. या मिळकतींना २६७-अ नुसार तिप्पट आकारणी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच वारंवार नोटीस बजावूनही थकबाकी न भरणाऱ्या बिगरनिवासी मिळकतींचा लिलाव करण्यात येणार आहे. त्यातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळेल, असा अंदाज कुमार यांनी वर्तविला आहे. याशिवाय बांधकाम परवानगी, पाणीपट्टीतील पाच टक्के वाढ, आकाशचिन्ह आणि परवाना या विभागांकडूनही मोठ्या प्रमाणावर उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. अमृत योजनेतून महापालिकेला निधी मिळेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. महापालिकेच्या अंदाजपत्रकातील जमा बाजूमध्ये ४५० कोटींचे कर्ज घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे ही रक्कम जमा बाजूत दाखविण्यात आली आहे. त्यामुळेही उत्पन्नाच्या बाजूमध्ये फुगवटा दिसणार आहे.

### अंदाजपत्रकीय तूट?

» फेब्रुवारीअखेरपर्यंत महापालिकेला मिळकतकरातून दोन हजार कोटींचे उत्पन्न मिळाले आहे, तर एकूण उत्पन्न सहा हजार कोटींपर्यंत पोहोचल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. गेल्या वर्षी अंदाजपत्रकात नऊ हजार ५१५ कोटींचे उत्पन्न गृहीत धरण्यात आले होते. चालू आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यासाठी अवघे काही दिवस राहिले आहेत. त्यामुळे उर्वरित काही दिवसांत तीन ते सव्वातीन हजार कोटींचे उत्पन्न मिळणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.


# पुणे विभागात पुढील दोन वर्षांत २९ हजार नोकऱ्या

## पुणे विभागात पुढील दोन वर्षांत 16 हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे विभागात पुढील दोन वर्षांत १६ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे २९ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. यागुंतवणुकीबाबतच्या ७२ परस्पर सामंजस्य करारांवर जिल्हास्तरीय औद्योगिक गुंतवणूक परिषदेत गुरूवारी स्वाक्षरी करण्यात आली.**

उद्योग संचालनालयाच्या अखत्यारीतील जिल्हा उद्योग केंद्र पुणेतर्फे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरमध्ये (एमसीसीआय) जिल्हास्तरीय औद्योगिक गुंतवणूक परिषद २०२४ चे आयोजन गुरूवारी करण्यात आले. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, एमसीसीआयएचे महासंचालक प्रशांत गिरबने उपस्थित होते.यावेळी बोलताना उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत म्हणाले की, राज्य सरकारकडून जिल्हास्तरीय औद्योगिक गुंतवणूक परिषद घेतल्या जात आहे. मागील काही दिवसात पुणे विभागातील सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये



परिषद झाली. आता पुण्यात ही परिषद होत आहे. या परिषदेच्या निमित्ताने पुणे विभागातील १६ हजार ५८९ कोटी रुपयांच्या एकूण ७२ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली आहे. यामुळे २९ हजार १३ रोजगार निर्माण होणार आहेत. महाराष्ट्राच्या निर्यातीची परिस्थिती, उद्योगांना नियंत्रित करणारी धोरणे आणि आगामी गुंतवणूक परिषदेविषयी माहितीही राजपूत यांनी दिली. त्यांनी राज्याच्या निर्यात, उद्योग आणि आयटी-आयटीईएस धोरणांची रूपरेषा सांगितली. विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी उद्योजकांना पाठिंबा देण्यासाठी आणि या प्रदेशातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी जिल्हा विकासासाठी विविध विभागांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी जिल्हा धोरण आराखड्याचे महत्त्व मांडले. कार्यक्रमात एनझेडयुआरआय पुणे नॉलेज पार्क प्रायव्हेट लिमिटेड आणि जीव्हीएस एअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यासह विविध क्षेत्रांमध्ये प्रस्तावित गुंतवणुकीसाठी ७२ गुंतवणूकदार आणि जिल्हा उद्योग केंद्र पुणे यांच्यात सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली.

### 2024 चे आयोजन गुरूवारी

» गिरबाने यांनी प्रास्ताविकात विविध क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राच्या प्रगतीविषयी माहिती दिली. निर्यातीत अग्रेसर पाच राज्यांपैकी एक महाराष्ट्र असल्याचे सांगताना निर्यातीला चालना देण्यात पुण्याच्या वाहन अभियांत्रिकी क्षेत्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असल्याचे त्यांनी सांगितले.पुणे विभागात पुढील दोन वर्षांत १६ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे २९ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. उद्योग संचालनालयाच्या अखत्यारीतील जिल्हा उद्योग केंद्र पुणेतर्फे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरमध्ये (एमसीसीआय) जिल्हास्तरीय औद्योगिक गुंतवणूक परिषद २०२४ चे आयोजन गुरूवारी करण्यात आले.

## प्रदूषण व वाढती वाहन संख्यावर उपाय

# शहरात 'सायकल टू वर्क थर्सडे'!

### आयुक्त शेखर सिंह : लोकसहभागातून मोहीमेस व्यापक स्वरूप देणार!

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहरातील दुचाकी आणि चारचाकी वाहनांची रस्त्यांवरील वाढती संख्या आणि प्रदूषणात तसेच तापमानात होणारी वाढ लक्षात घेता यासंदर्भात कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने दर गुरूवारी सायकलवरून कामावर अर्थात "सायकल टू वर्क थर्सडे" हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत सहभाग वाढीनंतर रस्त्यांवरील रहदारी कमी होण्यास तर मदत मिळेलच पण त्यासोबत दर गुरूवारी आरोग्यदायी प्रवासाचा आनंद घेता येणार आहे. यामध्ये नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्वाचा असून लोकप्रतिनिधींच्या पुढाकारातून या उपक्रमाला आणखी व्यापक रुप देण्यास मदत मिळू शकते, असे मत आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी "सायकल टू वर्क थर्सडे" या उपक्रमाचा शुभारंभ झाला. या उपक्रमामध्ये स्वत: आयुक्त शेखर सिंह यांनी भाग घेत निवासस्थानापासून ते कार्यालयापर्यंत सायकलवर प्रवास केला. तसेच इतर अधिकारी, कर्मचारीही आज कार्यालयात सायकलवर उपस्थित झाले. त्यामध्ये सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, उपअभियंता सुनिल पवार, कनिष्ठ अभियंता सुनिल बेळगावकर, संतोष कुदळे, कॉम्प्युटर ऑपरेटर अनंत चुटके तसेच पिंपरी चिंचवडचे बायसिकल मेयर आशिक जैन तसेच कर्मचारी यांचा समावेश होता.

### काय म्हणाले आयुक्त शेखर सिंह?



»आयुक्त शेखर सिंह म्हणाले, शहरातील प्रदूषण, रस्त्यांवरील वाहनांची वाढती संख्या, वाढते शहरी तापमान या सर्व समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना आणि उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच या उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग तितकाच महत्वाचा असून प्रत्येकाने वैयक्तिक पुढाकार घेऊन या उपक्रमांमध्ये हातभार लावणे गरजेचे आहे. दर गुरूवारी "सायकल टू वर्क थर्सडे" या उपक्रमात महापालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे नागरिकही सायकलचा वापर करून निरोगी आणि पर्यावरणपुरक भविष्याच्या दिशेने वाटचाल करू शकतात आणि तरूण पिढीलाही या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देऊ शकतात, असेही आयुक्त सिंह यावेळी म्हणाले.

### काय म्हणाले आमदार महेश लांडगे?



»शहरातील दुचाकी आणि चारचाकी वाहनांची रस्त्यांवरील वाढती संख्या आणि प्रदूषणात तसेच तापमानात होणारी वाढ लक्षात घेता यासंदर्भात कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने दर गुरूवारी सायकलवरून कामावर अर्थात "सायकल टू वर्क थर्सडे" हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे आम्ही स्वागत करतो. "सायकल टू वर्क थर्सडे" या मोहिमेत सहभाग वाढीनंतर रस्त्यांवरील रहदारी कमी होण्यास तर मदत मिळेलच पण त्यासोबत दर गुरूवारी आरोग्यदायी प्रवासाचा आनंद घेता येणार आहे. यामध्ये नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्वाचा आहे. पिंपरी-चिंचवडकरांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.

# तुम्ही सत्तेसाठी; आम्ही तत्त्वांसाठी पक्ष सोडला!

### संजोग वाघेरे यांचा पलटवार : खासदार बारणे लोकांना ओळखत नाहीत ही शोकांतिका

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**खासदार श्रीरंग बारणे हे विद्यमान खासदार आहेत. ते जर मतदारसंघातील नागरिकांना ओळखत नसतील तर ही शोकांतिका आहे. त्यांना समजलं पाहिजे की ते कुणाबद्दल बोलत आहेत. कारण मी त्यांच्या मतदारसंघात राहतो. माझं मूळ गाव, जन्मभूमी आणि कर्मभूमी ही पिंपरी गाव आहे. ते चुकीचं बोलत आहेत, असं म्हणत संजोग वाघेरे यांनी बारणे यांना खोचक टोला लगावला. पुढे ते म्हणाले, ते कुठल्या पक्षातून कुठल्या पक्षात आले आहेत, हे सर्वांना माहीत आहे. त्यांनी सत्तेसाठी पक्ष सोडला. आम्ही तत्वांसाठी पक्ष सोडला. आम्ही सत्तेसाठी दुसऱ्या पक्षात गेलो नाहीत, असे खणखणीत प्रत्त्यूत्तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी दिली आहे.**




मावळचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी नुकतीच संजोग वाघेरे यांच्यावर टीका करत त्यांच्यावर अधिक बोलण्यास नकार दिला होता. 'ज्या व्यक्तीचा मावळ मतदारसंघात थांग पत्ता नाही अशा व्यक्तींवर मी बोलणार नाही. पक्षनिष्ठेबाबत त्यांनी मला सांगू नये',असे बारणे यांनी म्हटले होते.

मावळ लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार श्रीरंग बारणे आणि शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात चांगलीच जुंपली आहे. दोन्ही उमेदवारांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. नुकतेच श्रीरंग बारणे यांनी संजोग वाघेरे यांच्यावर मी बोलणार नाही. त्यांचा मतदारसंघात थांग पत्ता नाही. त्यांच्यावर काय बोलू असं म्हणत टीका केली होती. यावर संजोग वाघेरे यांनी पलटवार करत सत्तेसाठी पक्ष बदलणाऱ्यांनी बोलू नये, असा टोला लगावला आहे. संजोग वाघेरे पिंपरीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

### संजोग वाघेरेंच्या प्रचाराचा नारळ फुटला...

» महाविकास आघाडीचे जागा वाटपाचे सूत्र निश्चित झाले नसताना उद्धव ठाकरे यांनी रायगड दौऱ्यात मावळमधून संजोग वाघेरे यांची उमेदवारी जाहीर करताच वाघेरे यांनी प्रचाराला सुरुवात केली. विजय निश्चित असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता पुढील आठवड्यात लागण्याची शक्यता आहे. राजकीय पक्षांकडून निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे. ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मावळ मतदारसंघातील रायगड जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघात दौरा केला. या दौऱ्यात वाघेरे यांची उमेदवारी जाहीर केली. ते विक्रमी मतांनी विजयी होतील, असा विश्वासही ठाकरे यांनी व्यक्त केला.

» ठाकरे यांनी उमेदवारी जाहीर करताच वाघेरे यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये नागरिकांच्या गाठीभेटी घेण्यावर भर दिला आहे. वाघेरे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचीही मदत होताना दिसत आहे.



## भूमिका

# 'असे' प्रदर्शन का घडवले असेल?

**भारत जगातला श्रीमंत देश नसला म्हणून काय झाले, जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती तर भारतात आहे.. या ना त्या मार्गाने जग भारतापुढे झुकते आहे ना.. देश कशात तरी नंबर वन गणला जातो आहे ना.. त्यातून देशाची ताकदच दिसते आहे ना..**

अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री वेडिंग समारंभाने वेधून घेतलेले सगळय़ांचे लक्ष ही बाब भारतातील राजकीय अर्थव्यवस्था आणि संस्कृती या दोहोंमध्ये झालेल्या मोठ्या बदलांचे दृश्य स्वरूप आहे. या एकूणच कार्यक्रमाभोवती सातत्याने वलयाचे कोंदण असेल याची नीट व्यवस्था करणे यात आश्चर्य वाटावे असे काहीच नाही. मानवी दृष्टिकोनातून पाहता या कार्यक्रमाची पटकथा कमालीची मोहक आहे. संपत्ती, बाहुबळ, वलयांकितता, कौटुंबिक मूल्ये, धार्मिकता आणि सूरज बडजात्यांनाही गुंफता येणार नाही अशा वैयक्तिक संघर्षांची किनार यांचे या पटकथेत परिपूर्ण मिश्रण आहे. संपत्तीचे असे प्रदर्शन करण्यामधून लोकांमध्ये मत्सर निर्माण होतो, असे जे बुद्धिजीवी वर्गाला वाटते, ते फारसे खरे नाही. माणूस सहसा त्याच्या निकटतम लोकांशी स्पर्धा करतो, तेव्हा त्यातून ईर्षा निर्माण होते. ती सहसा श्रीमंतांबद्दल नसते. आत्यंतिक टोकाची असमानता असलेल्या आपल्यासारख्या समाजात श्रीमंतीच्या अशा



प्रदर्शनांबद्दल विकृत प्रतिक्रिया असू शकतात. पण एखाद्याकडे खूप संपत्ती असेल, त्याने प्रचंड यश मिळवले असेल, तर बाकीच्यांना ते पाहावत नाही, असे म्हणत त्या नाराजी किंवा विकृतीवर पांघरूण घातले जाते. एकूण काय, श्रीमंतांबद्दल सामान्यांना 'विचित्र सहानुभूती' असते असे अर्थतज्ज्ञ ॲडम स्मिथ यांचे म्हणणे होते.श्रीमंतांनी केलेल्या श्रीमंतीच्या प्रदर्शनातून सामान्य लोकांच्या मनात एक प्रकारची प्रेरणा निर्माण होतेच शिवाय पैशांमधून मिळणारा आनंद कसा असू शकतो याची ठोस प्रतिमा त्यांच्या मनात तयार होते. म्हणूनच जगात सगळीकडेच सामान्य माणसांना एकुणातच श्रीमंताच्या यशाबद्दल नाराजी असण्यापेक्षाही त्यांच्याबद्दल एक उत्सुक आकर्षण असते, त्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि आकांक्षांबद्दल सहानुभूती असते.

एखाद्याच्या श्रीमंतीमधून आलेल्या वलयाची चर्चा होते. एखाद्याच्या श्रीमंतीमधून उद्योग उभे राहतात तर एखाद्याच्या श्रीमंतीमधून बाहुबळाचे दर्शन होते. या विशिष्ट प्रकरणात, या सगळय़ाच घटकांचे एकत्रीकरण आहे आणि त्यामुळे ती आणखी रंजक आहे. स्वत:बद्दल फारसे न व्यक्त होण्याच्या भारतीय उद्योगाच्या पारंपरिक भूमिकेत तिच्यामुळे बदल होताना दिसतो आहे. जणू चित्रपटांच्या क्षेत्रातील सर्वात मोठय़ा निर्मात्यांनी स्वत:वरच चित्रपट बनवला आहे. मनोरंजन उद्योगाचे सर्वात शक्तिशाली नियंत्रक स्वत:च मनोरंजनाचा भाग बनले आहेत आणि बातम्यांचे मालक बातमी बनले आहेत.

यापैकी काही गोष्टी संस्कृतीतील व्यापक बदलांमुळे घडलेल्या असू शकतात. आजकाल तुम्ही तुमचे अस्तित्व समाज माध्यमांवर अधोरेखित केलेले नसेल तर कदाचित प्रत्यक्षातही तुम्ही कदाचित अस्तित्वात नाही, असेच मानले जाते. आपल्या आत्यंतिक खासगी पैलूंचेही सार्वजनिक प्रकटीकरण करणे, त्याबद्दल इतरांनी प्रतिक्रिया व्यक्त करणे आजकाल आवश्यक होऊन बसले आहे. मित्र एकमेकांबद्दल काय विचार करतात, पालक आपल्या मुलांबद्दल काय विचार करतात, एखाद्या नववधूबद्दल तिची सासरची मंडळी काय विचार करतात, आपले कुणावर प्रेम आहे (किंवा कुणाबद्दल आपल्याला द्वेष वाटतो आहे) हे सगळे त्या त्या संबंधित व्यक्तीपर्यंत थेट पोहोचवण्यापेक्षाही प्रत्यक्ष न दिसणाऱ्या, अमूर्त अशा प्रेक्षकांना उद्देशून सार्वजनिक पातळीवर ते सांगितले जाते. परोपकार, धार्मिकता, भक्ती, करुणा, प्रेम, मैत्री, कौटुंबिक बंध सार्वजनिक पातळीवर व्यक्त करणे एके काळी अप्रासंगिक मानले जायचे. आता ते तसे करणे हेच सगळय़ात महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. समाज माध्यमांवर लोक ज्या पद्धतीने स्वत:ला व्यक्त करतात, ते अनेकदा तणाव निर्माण करणारेही मानले जाते. तिथे दोन्ही गोष्टी आहेत, एक म्हणजे स्वत:ला सर्वात आदर्श पद्धतीने सादर करणे आणि दुसरे म्हणजे हा मी असा आहे.

## संपादकीय »

### नक्षलींचा 'निकाल'

***दहशतवाद किंवा नक्षलवादासारखी हिंसक समस्या लोकभावना चेतवून सोडवता येत नाही. त्यासाठी कायद्याचे अधिष्ठान असलेली जबर राजकीय इच्छाशक्ती लागते.***

दहशतवाद किंवा नक्षलवादासारखी हिंसक समस्या लोकभावना चेतवून सोडवता येत नाही. त्यासाठी कायद्याचे अधिष्ठान असलेली जबर राजकीय इच्छाशक्ती लागते. ती नसली तर न्यायाच्या कसोटीवर सरकारचे तोंडघशी पडणे हे ठरलेले. ते कसे हे जाणून घ्यायचे असेल तर जिज्ञासूंनी नक्षलवादाचा आरोप असलेले जी. एन. साईबाबा यांना निर्दोषत्व बहाल करताना दिलेले निकालपत्र जरूर वाचावे. याच साईबाबांना उच्च न्यायालयाच्या याच नागपूर खंडपीठानेही आधी निर्दोष सोडले होते. बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्यातील (यूएपीए) कलमे लावताना तपास यंत्रणांनी कायदेशीर तरतुदीचे पालन केले नाही हा तेव्हाच्या निकालाचा मुख्य आधार होता. इतक्या महत्त्वाच्या प्रकरणात केवळ तांत्रिक आधारावर आरोपीची सुटका करणे अयोग्य असा युक्तिवाद करून राज्य सरकारने त्या निकालाला तेव्हा तातडीने आव्हान दिले.

जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानातील वादग्रस्त व्याघ्रसफारीच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत संवेदनशील विषयाला वाचा फोडली आहे. अभयारण्यात वनपर्यटनापेक्षा पशुसंवर्धनाला अधिक प्राधान्य राहील, हा संदेश यानिमित्ताने दिला गेला असून तो दूरगामी परिणाम करणारा ठरेल.

# कॉर्बेट उद्यानाचा धडा आणि काही प्रश्न..

व्याघ्रसफारी निर्मिण्याच्या निमित्ताने देशातील या सर्वात मोठ्या आणि पहिल्या राखीव व्याघ्र अभयारण्यामध्ये गेल्या काही वर्षांत उभ्या राहिलेल्या अनियमित, अनिर्बंध, अवैध बांधकामांबद्दल आणि बेलगाम वृक्षतोडीबद्दल सर्वोच्च न्यायालयाने उत्तराखंडमधील राजकारणी-नोकरशहा यांच्या अभद्र युतीवर कडक ताशेरे ओढले. न्या. भूषण गवई, न्या. पी. के. मिश्रा, न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने या प्रकरणी भाष्य करताना उत्तराखंडचे तत्कालीन वनमंत्री हरकसिंह रावत आणि जिल्हा वनाधिकारी किशन चंद यांना फैलावर घेतले. 'कायद्याची कसलीही चाड न बाळगता यांनी व्यावसायिक कारणासाठी मोठय़ा प्रमाणात झाडे तोडण्याचा उद्योग केला आणि जनतेच्या विश्वासालाच केराची टोपली दाखवली' असे म्हटले आहे. जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानाशी संबंधित दोन स्वतंत्र बाबींवर सर्वोच्च न्यायालयाने टिप्पणी केलेली असली, तरी ही मते देशातील इतर अभयारण्यांना आणि तेथील वनक्षेत्र-



पशू अधिवास संकोचालाही लागू पडतात. त्यामुळे त्यांची दखल घ्यावी लागते. कारण 'वाघ जगला तर जंगले जगतील', हे या मातीतले पारंपरिक शहाणपण जणू विस्मृतीत गेल्यागत व्यवहार अनेक ठिकाणी सुरू आहेत. वनविभागाला आणि पर्यायाने सरकारला महसूल मिळावा यासाठी कोणत्याही अभयारण्यामध्ये पर्यटकांचा राबता आवश्यक असतो असा युक्तिवाद नेहमी केला जातो. त्यात तथ्यही आहे, पण ते अनेकदा सोयीस्करपणे वापरले जाते. शिवाय आपल्याकडे पर्यटकांचा राबता हा किती अभयारण्यांमध्ये तेथील हक्काचे मूळ निवासी – वन्यप्राणी आणि आदिवासी – यांच्यासाठी उच्छादमूलक बनला आहे याचाही ठाव घेतला पाहिजे. कॉर्बेट उद्यानाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, पर्यटकांच्या जीपवर चालून जाणारे हत्ती आणि क्वचित प्रसंगी आक्रमक वाघ यांच्या चित्रफिती काढून, त्या अग्रेषित करून त्यांतील 'थरार' अनुभवला जातो. पण अशा प्रकारे सातत्याने प्राण्यांच्या अधिवासात हस्तक्षेप करून आपण त्यांचे शांततामय दैनंदिन जीवन विस्कळीत करतो याचा गंधही अशा तथाकथित पर्यटकांना आणि त्यांचे रंजन करण्यासाठी आसुसलेल्या वनरक्षक, सफारी वाहनचालकांना नसतो. हे चित्र केवळ ढासळत्या वनपर्यटन अभिरुचीचे निदर्शक नसून, अभयारण्यांमधील वनविभागाच्या शिस्तीची पकड ढिली पडत चालल्याचेही ते दाखवून देते. कोणत्याही आरक्षित वनक्षेत्रामध्ये गाभा (कोअर) आणि उभयान्तरवर्ती (बफर) असे दोन भाग असतात. कोअर क्षेत्रामध्ये वनकर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतरेजनांच्या विहारावर कडक बंधने असतात, कारण ते क्षेत्र पूर्णतया वन्यप्राण्यांसाठी राखीव असते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# नमो महासंमेलनाला परवानगी कशी?

## आ. अनिल देशमुख: कोल्हापूर येथील न्यू पॅलेसवरील कार्यालियात पत्रकारांशी संवाद

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरात भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने 'नमो युवा महासंमेलन'चे आयोजन करण्यात आले आहे. हा राजकीय कार्यक्रम शासकीय जागेत करीत असताना सर्व नियम धाब्यावर बसविण्यात आले आहेत. या कार्यक्रमाला देण्यात आलेली परवानगी सुध्दा आता वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.**

संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन जे कोणी दोषी असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी राज्यपाल व कुलपती रमेश बैस यांच्याकडे पत्राद्वारे राज्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आ. अनिल देशमुख यांनी केली आहे. राज्यपांलाना लिहलेल्या पत्रात अनिल देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. यात कोणताही कार्यक्रम करीत असताना साधारणता अगोदर परवागी घेण्यात येते आणि नंतर कार्यक्रम जाहीर करण्यात येतो. परंतु अगोदर हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आणि नंतर विद्यापीठाकडून परवानगी घेण्यात आली.

परवानगी देताना काही नियम व अटी साधरणता लावल्या जातात, परंतु या कार्यक्रमला कोणतेही नियम व अटी लावल्या नसल्याची माहिती आहे. विद्यापीठाचे कामकाज सुरु असलेल्या दिवशी ही परवागी कशी देण्यात आली. ज्या ठिकाणी हा कार्यक्रम घेण्यात आला त्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर हा विद्यापीठाचा मुख्य शैक्षणिक परिसर आहे. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रासाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. सुमारे ९००० मे. वॅट सौरऊर्जेसाठी विकासकांना देकारपत्र (लेटर ऑफ अवॉर्ड) आज (दि. ७) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यातून ४०,००० कोटी रुपये गुंतवणूक होणार असून, २५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत. यामुळे पुढच्यावर्षी ४० टक्के कृषीफिडर हे सौरऊर्जेवर येणार असून, शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणे शक्य होणार आहे.



स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवून हे देकारपत्र आज (दि. ७) सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी, यासाठी २०१६ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना प्रारंभ केली होती. त्यानंतरच्या काळात २००० मे.वॅट पर्यंत निर्मिती करण्यात आली. आता ९००० मे.वॅट सौरऊर्जा तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे ४० टक्के कृषीफिडर हे सौरऊर्जेवर येतील. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे. राज्यातील असंख्य शेतकऱ्यांची दिवसा वीजेची सातत्याने मागणी होती. ही मागणी आता पूर्ण करणे शक्य होणार आहे. त्यामुळे हा दिवस महाराष्ट्राच्या कृषी जगतात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. अतिशय कमी कालावधीत प्रकल्पासाठी जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे प्रकल्पाचे कार्यान्वयन शक्य होणार आहे. सर्वांत आधी सौर ऊर्जेवरील ही संकल्पना प्रायोगिक तत्वावर राळेगण सिद्धी (जि. नगर) येथे साकारण्यात आली.याच परिसरात विद्यापिठाचे मुख्य प्रशासकीय कार्यालय आहे. या परिसरात जवळपास ८० टक्के कर्मचारी व अधिकारी ज्यामध्ये कुलगुरू, प्र. कुलगुरू, कुलसचिव यांची कार्यालये आहेत. असे असतानाही कामाच्या दिवशी ही परवानगी का देण्यात आली? असा सवाल त्यांनी केला आहे. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशाकीय इमारत परिसर हा शांतता झोन आहे. असे असतांना जोरजोराने नारेबाजी करण्यात आली. विद्यापीठाचा संपुर्ण परिसरात हा शासकीय आहे. असे असताना सुध्दा संपुर्ण परिसरात भाजपचे मोठमोठे झेंडे येथे कसे लावण्यात आले? व्यवस्थापन परिषद हे विद्यापिठाच्या हिताचे निर्णय घेणारे सर्वोच्च प्राधिकरण आहे. प्राधीकरणाने राजकीय कार्यक्रम विद्यापीठ परिसरात घेण्याची परवानगी कशी काय दिली? हा एक महत्वाचा प्रश्न यानिमित्ताने निर्माण होतो. यामुळे या कार्यक्रमाची परवानगी कशी देण्यात आली आणि परसिरात नियमांची जी पायमल्ली झाली याची सखोल चौकशी करुन यातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.। संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन जे कोणी दोषी असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी राज्यपाल व कुलपती रमेश बैस यांच्याकडे पत्राद्वारे राज्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आ. अनिल देशमुख यांनी केली आहे. राज्यपांलाना लिहलेल्या पत्रात अनिल देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. यात कोणताही कार्यक्रम करीत असताना साधारणता अगोदर परवागी घेण्यात येते आणि नंतर कार्यक्रम जाहीर करण्यात येतो. परंतु अगोदर हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आणि नंतर विद्यापीठाकडून परवानगी घेण्यात आली.

### आजचा दिवस ऐतिहासिक

» परवानगी देताना काही नियम व अटी साधरणता लावल्या जातात, परंतु या कार्यक्रमला कोणतेही नियम व अटी लावल्या नसल्याची माहिती आहे. विद्यापीठाचे कामकाज सुरु असलेल्या दिवशी ही परवागी कशी देण्यात आली. ज्या ठिकाणी हा कार्यक्रम घेण्यात आला त्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर हा विद्यापीठाचा मुख्य शैक्षणिक परिसर आहे. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रासाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. सुमारे ९००० मे. वॅट सौरऊर्जेसाठी विकासकांना देकारपत्र (लेटर ऑफ अवॉर्ड) आज (दि. ७) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

# खवय्यांना महाशिवरात्रीच्या उपवासाचे लागले वेध

## मागील वर्षीच्या तुलनेत तो स्थिरावला आहे; शेंगदाणे स्वस्त,साबुदाणा स्थिर!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाशिवरात्रीला मोठ्या संख्येने भाविक उपवास करतात. या पार्श्वभूमीवर आठवडाभरापासून फराळाच्या पदार्थांना मागणी वाढली आहे.**





महाशिवरात्रीनिमित्त शहरी भागात विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांमध्ये फराळाच्या पदार्थांचे वाटप केले जाते. घरोघरी उपवास केला जात असल्याने किरकोळ बाजारात साबुदाणा, शेंगदाणा, राजगिरा, खजूर आणि फळांच्या मागणीत वाढ झाली आहे. रोजच्या स्वयंपाकासह उपवासात वापरला जाणारा शेंगदाणे मागील वर्षी तेजीत होते. यंदा १५० रुपये किलोवरून दर १४० रुपयांवर आला आहे. नवीन आवक सुरू झाल्याने ही घसरण झाली आहे. मेमध्ये साबुदाणा महागणार साबुदाणा ९० रुपये किलो आहे. मागील वर्षीच्या तुलनेत तो स्थिरावला आहे.

मात्र, मे आणि जूनमध्ये त्याचे दर वाढण्याची शक्यता आहे. सध्या उत्पादन चांगले असून, मागणी कमी झाली आहे. भगर महागली:अनेक ठिकाणी महाशिवरात्रीला उपवासात भगर खाण्याची प्रथा आहे.

त्यानुसार भगरीची मागणी वाढली आहे. गेल्या महिन्यात ११५ रुपये किलो असलेली भगर आता १२० ते १२५ रुपये किलोपर्यंत उपलब्ध आहे. मागणी वाढल्याने ही भाववाढ झाली आहे. महाशिवरात्रीनिमित्त शहरी भागात विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांमध्ये फराळाच्या पदार्थांचे वाटप केले जाते. घरोघरी उपवास केला जात असल्याने किरकोळ बाजारात साबुदाणा, शेंगदाणा, राजगिरा, खजूर आणि फळांच्या मागणीत वाढ झाली आहे. रोजच्या स्वयंपाकासह उपवासात वापरला जाणारा शेंगदाणे मागील वर्षी तेजीत होते.

### मागणी कमी झाली आहे

» यंदा १५० रुपये किलोवरून दर १४० रुपयांवर आला आहे. नवीन आवक सुरू झाल्याने ही घसरण झाली आहे. मेमध्ये साबुदाणा महागणार साबुदाणा ९० रुपये किलो आहे. मागील वर्षीच्या तुलनेत तो स्थिरावला आहे. मात्र, मे आणि जूनमध्ये त्याचे दर वाढण्याची शक्यता आहे. सध्या उत्पादन चांगले असून, मागणी कमी झाली आहे.

# तलवार घेऊन कोण आंदोलन करते?

## सरकारने फोटो दाखवताच हायकोर्टाचा शेतकऱ्यावर संताप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

पंजाब आणि हरियाणात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. दरम्यान या आंदोलनाबाबत चंदीगड येथील उच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी कोर्टाने शेतकऱ्यांवर नाराजी व्यक्त केली.संपूर्ण प्रकरणात दोन्ही राज्ये आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडण्यात अपयशी ठरली आहेत. शेतकरी शुभकरन यांच्या मृत्यूची चौकशी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश करणार असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.



यासाठी ३ सदस्यीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. सुनावणीदरम्यान हरियाणा सरकारने हायकोर्टाला आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांची अनेक फोटो दाखवली आहेत. यामुळे कोर्टाने शेतकऱ्यांची बाजू मांडणाऱ्या वकिलांना देखील फटकराले.ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. तुम्ही लोक मुलांना पुढे करत आहात, तुम्ही कसले पालक आहात. मुलांच्या वेषात निदर्शने होत आहेत आणि तीही शस्त्रे घेऊन. तुम्हा लोकांना इथे उभे राहण्याचा अधिकारही नाही. तुम्ही तेथे युद्ध करणार आहात का? ही पंजाबची संस्कृती नाही. तुमच्या नेत्यांना अटक झाली पाहिजे. तुम्ही लोक निरपराध लोकांना पुढे करत आहात, हे अत्यंत लाजिरवाणे आहे.आंदोलन शांततापूर्ण असल्याचे सांगणाऱ्या वकिलांना न्यायालयाने फटकारले. येथे उभे राहून बोलणे खूप सोपे आहे. पटियालाची घटना विसरलात का? जेव्हा एका पोलिस अधिकाऱ्याचा हात कापला गेला. हातात तलवार घेऊन कोण शांततेने आंदोलन करतं?, असा प्रश्न हाय कोर्टाने उपस्थित केला.एसीजे जीएस संधवालिया आणि न्यायमूर्ती लुपिता बॅनर्जी यांच्या खंडपीठाने तुम्ही दिल्लीत युद्धासाठी जात आहात का, असा प्रश्न विचारला. अशी तयारी करून जायची काय गरज आहे? निष्पाप लोकांना पुढे करणे योग्य नाही. तुमच्या नेत्यांना तुरुंगात पाठवले पाहिजे. मुलांच्या वेषात निदर्शने करणे लज्जास्पद आहे. तुम्ही जे करत आहात ती पंजाबची संस्कृती नाही.शेतकरी नेते पंढेर आणि जगजित सिंग डल्लेवाल यांनी गेल्या रविवारी देशभरातील शेतकऱ्यांना ६ मार्चला दिल्ली गाठण्याचे आवाहन केले होते, तर १० मार्चला शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी तासभर आंदोलन करण्यात येणार आहे. 'रेल रोको' निदर्शने करण्याते आवाहनही करण्यात आले आहे.पिकांसाठी किमान आधारभूत किंमत च्या कायदेशीर हमीसह विविध मागण्यांसाठी सरकारवर दबाव आणण्यासाठी संयुक्त किसान मोर्चा (गैर-राजकीय) आणि किसान मजदूर मोर्चा दिल्ली चलो मोर्चाचे नेतृत्व करत आहेत. एमएसपीची मागणी रेटण्यासाठी दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करण्याच्या इशाऱ्यामुळे दिल्लीतून इतर राज्यांमध्ये जाणाऱ्या सर्व राज्यांच्या सीमांवर पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. त्याचप्रमाणे दिल्लीतील आंतरराज्य बस स्थानकांवर सुद्धा पोलिसांनी बंदोबस्त वाढविला आहे. दरम्यान, दिल्लीकडे जाणाऱ्या अनेक निदर्शक शेतकऱ्यांना ताब्यात घेण्यात आले आहे, असे शेतकरी नेत्यांनी म्हटलं आहे. पोलिसांनी एकाही आंदोलकाला अटक केली नसल्याचा दावाही अहवालात करण्यात आला आहे. त्यात म्हटले आहे की, शेतकरी नेत्यांनी बुधवारी पुन्हा आंदोलन सुरू करण्याची योजना आखली होती, देशभरातील शेतकऱ्यांना बस आणि ट्रेनने दिल्लीला पोहोचण्याचे आवाहन केले होते कारण त्यांचे ट्रॅक्टर थांबवण्यात आले होते आणि जमाव पांगला गेला होता. यासाठी अश्रुधुराचा आणि पाण्याच्या तोफांचा वापर करण्यात आला. .अहवालात युनायटेड किसान मोर्चा (गैर-राजकीय) च्या विधानाचा हवाला देत म्हटले आहे की, शेतकरी दिल्लीच्या दिशेने जाऊ लागले परंतु काही राज्यांमध्ये पोलिसांनी त्यांना रोखले.

### ही अत्यंत लाजिरवाणी बाब

राजस्थानमधील एका जिल्ह्यातील ५० शेतकऱ्यांना मंगळवारी (५ मार्च) रात्री ताब्यात घेण्यात आले, तर त्याच राज्यातून रेल्वेने दिल्लीला जाणाऱ्या इतरांना बुधवारी ताब्यात घेण्यात आले, असे शेतकरी नेत्यांनी पत्रकारांना सांगितले.पंजाब आणि हरियाणात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. दरम्यान या आंदोलनाबाबत चंदीगड येथील उच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी कोर्टाने शेतकऱ्यांवर नाराजी व्यक्त केली.संपूर्ण प्रकरणात दोन्ही राज्ये आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडण्यात अपयशी ठरली आहेत. शेतकरी शुभकरन यांच्या मृत्यूची चौकशी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश करणार असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. यासाठी ३ सदस्यीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. सुनावणीदरम्यान हरियाणा सरकारने हायकोर्टाला आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांची अनेक फोटो दाखवली आहेत. यामुळे कोर्टाने शेतकऱ्यांची बाजू मांडणाऱ्या वकिलांना देखील फटकराले.ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

# सार्वजनिक क्षेत्रातील युको बँकेत ८२० कोटींचा घोटाळा

## राजस्थानमध्ये सरकारी बँकेच्या 67 ठिकाणांवर सीबीआयचे छापे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

बँकेबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. संशयास्पद व्यवहार प्रकरणी केंद्रीय तपास संस्थेने दोन राज्यांतील ६७ ठिकाणी छापे टाकले. मिळालेल्या माहितीनुसार, हे संशयास्पद व्यवहार ८०० कोटी रुपयांहून अधिक किमतीचे आहेत. छाप्यादरम्यान सीबीआयने या ठिकाणांहून अनेक महत्त्वाची कागदपत्रे आणि डिजिटल उपकरणे जप्त केली आहेत.







गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२३ मध्ये या संदर्भात तक्रार दाखल करण्यात आली होती.सीबीआयने बुधवारी राजस्थान आणि महाराष्ट्रात हे छापे टाकले. ८२० कोटी रुपयांच्या संशयास्पद व्यवहारांबाबत छाप्यादरम्यान बँक आणि शी संबंधित सुमारे १३० कागदपत्रांसह ४३ डिजिटल उपकरणेही जप्त करण्यात आली आहेत. यामध्ये ४० मोबाईल फोन, २ हार्ड डिस्क आणि १ इंटरनेट डोंगलसह इतर गोष्टींचा समावेश आहे. युको बँकेच्या वेगवेगळ्या खात्यांमधून हे व्यवहार झाले. बँकेतील हे संशयास्पद व्यवहार १० नोव्हेंबर २०२३ ते १३ नोव्हेंबर २०२३ दरम्यान झाले. ७ खाजगी बँकांच्या १४,६०० खातेदारांनी बँकेच्या ४१,००० खातेदारांच्या खात्यात चुकीच्या पद्धतीने व्यवहार केले. या प्रकरणात मूळ खात्यातून एकही पैसा डेबिट झाला नाही, परंतु युको बँकेच्या ४१,००० खात्यांमध्ये एकूण ८२० कोटी रुपये जमा झाले. यापैकी बहुतांश खातेदारांनी वेगवेगळ्या बँकिंग चॅनेलद्वारे बँकेतून पैसे काढले.यापूर्वी या प्रकरणाच्या तपासादरम्यान सीबीआयने डिसेंबर २०२३ मध्येही अनेक ठिकाणी छापे टाकले होते. त्यानंतर कोलकाता आणि मंगळुरुमध्ये खासगी बँकधारक आणि युको बँकेच्या अधिकाऱ्यांच्या १३ ठिकाणांवर छापे टाकण्यात आले.

### 43 डिजिटल उपकरणे जप्त

याच क्रमाने ६ मार्च २०२४ रोजी सीबीआयने राजस्थान आणि महाराष्ट्रातील जोधपूर, जयपूर, जालोर, नागपूर, बारमेर, फलोदी आणि पुणे येथे छापे टाकले. या छाप्यांमध्ये युको बँक आणि आयडीएफसी बँकेशी संबंधित १३० संशयास्पद कागदपत्रे आणि ४३ डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली.

# धूम्रपान करत आमिरने मारल्या चाहत्यांशी गप्पा




गेले काही दिवस मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खान त्याची पूर्वाश्रमीची पत्नी आणि दिग्दर्शक किरण रावच्या 'लापता लेडीज' चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र होता. घटस्फोटानंतरही आमिर आणि किरणने एकत्र काम करण्याचा निर्णय घेतला. आज आमिर खान त्याच्या प्रोडक्शन्स हाऊसच्या इन्स्टाग्राम पेजवरून लाइव्ह आला होता. यात धूम्रपान करत त्याने चाहत्यांशी गप्पा मारल्या आणि अनेक प्रश्नांची उत्तरेदेखील दिली. एका चाहत्याने त्याला प्रश्न विचारला, "तुम्ही मुकेश अंबानींच्या मुलाच्या म्हणजेच अनंत अंबानींच्या प्री-वेडिंग सोहळ्यात डान्स केलात, परंतु तुमच्या मुलीच्या आयराच्या लग्नात तुम्ही अजिबात नाचला नाहीत. यावर आमिर म्हणाला, "डान्स तर मी माझ्या मुलीच्या लग्नातही केला होता आणि मुकेशच्या मुलाच्या लग्नातही केला; कारण मुकेश माझा खूप जवळचा मित्र आहे. नीता, मुकेश आणि त्यांच्या कुटुंबाला मी आपलंच कुटुंब मानतो."आमिरच्या या लाइव्हवर अजून एक प्रश्न आला, त्यात लिहिले होते की, तुम्ही 'पठाण' सारखे चित्रपट का बनवत नाही. यावर आमिर म्हणाला, यार शाहरुख खान बनवतोय ना 'पठाण' सारखे चांगले चित्रपट. मी 'लापता लेडीज' बनवला आहे, तुम्ही तो चित्रपट बघा."लोकांनी चांगल्या सिनेमाला आणि इंडस्ट्रीतील नवोदितांना पाठिंबा द्यावा. 'लापता लेडीज'ची निर्मिती करून त्याने हेच करण्याचा प्रयत्न केला आहे, असेही आमिर म्हणाला. चांगला सिनेमा चित्रपटगृहात चालत नाही आणि फक्त ॲक्शन चित्रपट चांगले चालतात, असे मानणाऱ्या लोकांना प्रेक्षक चुकीचे सिद्ध करतील.

# करण प्री-वेडिंगमध्ये होता गैरहजर



अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटचा प्री-वेडिंग सोहळा १ मार्च ते ३ मार्च दरम्यान जामनगरमध्ये पार पडला. जरी या भव्य सोहळ्यात बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी हजेरी लावली असली तरी चित्रपट निर्मिता, दिग्दर्शक आणि लेखक करण जोहर या सोहळ्याला अनुपस्थित होता. अंबानींच्या या खास सोहळ्याला न जाण्याच कारण करणने नुकतंच स्पष्ट केलं आहे. 'इंडिया टूडे'ने दिलेल्या माहितीनुसार, करणला अंबानींकडून प्री-वेडिंग सोहळ्याच आमंत्रण देण्यात आलं होतं आणि या सोहळ्यात त्याचा खास डान्स परफॉर्मन्सही होता. करणचा आणि फॅशन डिझायनर मनीष मल्होत्राचा एकत्रित डान्स होणार होता यासाठी त्यांनी रंगीत तालिमसुद्धा केली होती. परंतु जामनगरला निघण्याआधीच करणला ताप आला आणि या कारणामुळेचं करणने जामनगरला न जाण्याचा निर्णय घेतला.त्यानंतर, मनीष मल्होत्राने स्टार किड्स अनन्या पांडे, जान्हवी कपूर, सारा अली खान आणि खुशी कपूर यांच्याबरोबर डान्स परफॉर्मन्स केला. २००१ रोजी प्रदर्शित झालेल्या 'कभी खुशी कभी गम' या करणच्या ब्लॉकबस्टर चित्रपटातील 'बोले चुडिया' या लोकप्रिय गाण्यावर मनीष अभिनेत्रींबरोबर थिरकला . विशेष म्हणजे, या गाण्यातील कलाकारांसारखे मॅचिंग आऊटफिट्स मनीषने या स्टार किड्ससाठी डिझाइन केले होते.हा सोहळा आपल्या तब्येतीमुळे हुकल्याने करणने बुधवारी त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या प्री-वेडिंग सोहळ्यातील एक व्हिडीओ शेअर करत त्यांना शुभेच्छा दिल्या. या व्हिडीओला कॅप्शन देत करणने लिहिले होते, "अनंत आणि राधिका यांचे मनःपूर्वक अभिनंदन! हा सोहळा केवळ नात्यांचा, पाहुणचाराचा आणि प्रेमाचा नव्हता तर आपल्या वैभवशाली भारतीय परंपरेचा होता.

# जया बच्चन सोशल मीडियापासून लांब

बॉलीवूडच्या ज्येष्ठ अभिनेत्री जया बच्चन नेहमीच चर्चेत असतात. आत्तापर्यंत त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. आपल्या अभिनयाबरोबरच जया बच्चन त्यांच्या स्पष्टवक्त्या स्वभावामुळेही ओळखल्या जातात. इतर कलाकरांप्रमाणे जया बच्चन सोशल मीडियावर सक्रिय नसतात. त्या आपले फोटो व व्हिडीओ कधीच सोशल मीडियावर शेअर करताना दिसत नाहीत. एका मुलाखतीत त्यांनी सोशल मीडियापासून लांब राहण्यामागचे कारण सांगितले आहे. नुकतेच जया बच्चन यांनी त्यांची नात नव्या नवेलीच्या व्हॉट द हेल नव्या कार्यक्रमात हजेरी लावली. या कार्यक्रमात त्यांच्याबरोबर त्यांची मुलगी श्वेता बच्चनही हजर होती. यावेळी जया बच्चन यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक खुलासे केले. दरम्यान त्यांनी सोशल मीडिया न वापरण्यामागचे कारण सांगितले आहे. त्या म्हणाल्या, "जगाला आपल्याबद्दल खूप माहिती आहे. आम्हाला ते इन्स्टाग्रामवर शेअर करण्याची गरज नाही.सोशल मीडियावर नकारात्मक कमेंट्स करणाऱ्यांवर निशाणा साधला होता. त्या म्हणालेल्या, "जर तुम्हाला कमेंट करायची असेल, तर सकारात्मक करा. पण, तुम्हाला तर तुमचा निर्णयच ऐकवायचा असतो. जर टीका करणाऱ्यांना माझ्या समोर बसून बोलायला लावले तर त्यांची हिंमत होणार नाही.

# शाहरुखचा अंदाज

अनंत अंबानी व राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंगची सध्या जोरदार चर्चा चालू आहे. अंबानी कुटुंबीयांनी गुजरातमधील जामनगरमध्ये या भव्य सोहळ्याचं आयोजन केलं होतं. या कार्यक्रमाला संपूर्ण बॉलीवूड कलाविश्व एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. सध्या या प्री-वेडिंग कार्यक्रमाचे व्हिडीओ सर्वत्र व्हायरल होत आहेत.अंबानी कुटुंबीयांनी ६ मार्चला संध्याकाळी जामनगरमध्ये रिलायन्स समुहाच्या कर्मचाऱ्यांना एक खास पार्टी दिली. या पार्टीसाठी शाहरुख खान, सलमान खान, जान्हवी कपूर, रणवीर सिंह यांसारखे बरेच बॉलीवूड सेलिब्रिटी पुन्हा एकदा जामनगरमध्ये दाखल झाले होते. यावेळी या कलाकारांनी बॉलीवूडच्या लोकप्रिय गाण्यांवर डान्स केला. याशिवाय या पार्टीतील एक व्हिडीओ सर्वांचं विशेष लक्ष वेधून घेत आहे. यामध्ये शाहरुख खान सर्वांशी गुजरातीमध्ये संवाद साधत असल्याचं पाहायला मिळत आहे.

# ब्रेकअपनंतर सलमान-कतरिनाची 'अशी' होती अवस्था



बॉलीवूड अभिनेता सलमान खान व अभिनेत्री कतरिना कैफ नेहमीच चर्चेत असतात. एक काळ असा होता, जेव्हा दोघे एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. सगळीकडे त्यांच्याच नात्याची चर्चा सुरू होती. मात्र, हे नाते जास्त काळ टिकले नाही, काही वर्षातच दोघे वेगळे झाले. ब्रेकअपनंतरही त्यांच्या नात्याची अनेकदा चर्चा रंगताना दिसते. ब्रेकअपनंतर दोघे पहिल्यांदाच 'एक था टायगर' चित्रपटात एकत्र झळकले होते. दरम्यान, एका मुलाखतीत 'एक था टायगर' चित्रपटाचे दिग्दर्शक कबीर खान यांनी सलमान व कतरिनाबाबतचा एक किस्सा सांगितला आहे.अलीकडेच कबीर खानने कास्टिंग डायरेक्टर मुकेश छाब्रा यांच्या मॅशेबल इंडिया या नवीन पॉडकास्टमध्ये हजेरी लावली. या कार्यक्रमात त्यांनी 'एक था टायगर'मध्ये कतरिना आणि सलमानला एकत्र कास्ट करण्यामागचा खुलासा केला. कबीर म्हणाला, "एक था टायगर चित्रपटासाठी आम्ही कतरिनाला आधीच साइन केले होते. चित्रपटात तिची झोयाची व्यक्तिरेखा होती आणि मग आम्ही सलमान खानकडे गेलो. याच काळात त्यांचे ब्रेकअप झाले होते. असे असूनही या दोघांनी चित्रपटात उत्तम काम केले. पण, त्यावेळी दोघे एकमेकांबरोबर काम करताना अवघडल्यासारखे वाटत होते."मीडिया रिपोर्ट्सनुसार, सलमान आणि कतरिनाने २००५ मध्ये एकमेकांना डेट करायला सुरुवात केली. मात्र, पाच वर्षातच त्यांचे नाते तुटले. २०१० मध्ये दोघांचे ब्रेकअप झाले. ब्रेकअपनंतर कतरिनाने रणबीर कपूरला डेट करायला सुरुवात केली.

# फिरकीच्या जाळ्यात साहेब अडकले!

## कुलदीपचा पंजा तर अश्विनचा चौकार, इंग्लंड 218 धावांत ढेर!

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**धर्मशाला कसोटी सामन्यात इंग्लंडचा संघ फिरकीच्या जाळ्यात अडकला आहे. कुलदीप यादव आणि आर.अश्विन यांच्या भेदक माऱ्यापुढे इंग्लंडच्या फलंदाजांनी लोटांगण घातलं. पहिल्या डावात इंग्लंडचा संघ फक्त २१८ धावांत गारद झाला. भारताकडून कुलदीप यादवने पाच विकेट घेतल्या, तर १०० वा कसोटी सामना खेळणाऱ्या अश्विनने चार फलंदाजांची शिकार केली. रवींद्र जाडेजाला एक विकेट मिळाली. इंग्लंडकडून दिग्गज फलंदाज अपयशी ठरले.**



सलामी फलंदाज जॅक क्रॉऊली यानं फक्त भारतीय गोलंदाजांचा प्रतिकार केला. जॅक क्राऊली यानं ७९ धावांची खेळी केली. जॅकचा अपवाद वगळता इंग्लंडच्या एकाही फलंदाजाला ३० धावसंख्या पार करता आली नाही. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडची सुरुवात संयमी झाली, पण कुलदीप यादव यानं भेदक मारा करत इंग्लंडच्या फलंदाजीला सुरुंग लावला. बेन डकेट आणि जॅक क्राऊली यांनी ६४ धावांची सलामी दिली. ही जोडी धोकादायक ठरते की काय असं वाटत होतं. पण कुलदीप यादवनं १८ व्या षटकात बेन डकेट याचा अडथळा दूर केला. बेन डकेट याचा शुभमन गिल यानं अप्रतिम झेल घेतला. डकेट बाद झाल्यानंतर इंग्लंडची फलंदाजी ढेपाळली. इंग्लंडच्या फलंदाजांनी येरे माझ्या मागल्या प्रमाणे विकेट फेकल्या. जॅक क्राऊली यानं आपलं काम चोख बजावलं. जॅक क्राऊली यानं १०८ चेंडूमध्ये ७९ धावांची खेळी केली. यामध्ये ११ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. जॅक क्राऊलीचा अपवाद वगळता एकाही फलंदाजाला ३० धावसंख्या ओलांडता आली नाही. तीन फलंदाज खातेही उघडू शकले नाही. यामध्ये कर्णधार बेन स्टोक्स याचाही समावेस आहे. भारताच्या फिरकीच्या जाळ्यात इंग्लंडचा संघ अडकला. चांगल्या सुरुवातीनंतर इंग्लंडची फलंदाजी ढेपाळली. इंग्लंडचे आठ फलंदाज २०० धावांच्या आत गमावले. भारताकडून कुलदीप यादवने पाच फलंदाजांना तंबूत पाठवले. तर आर. अश्विन यानं चार विकेट घेतल्या तर जाडेजानं एका फलंदाजाला तंबूत पाठवलं. इंग्लंडकडून जॅक क्रॉली यानं संघर्ष केला. त्यानं १०८ चेंडूत १ षटकार आणि ११ चौकारांच्या मदतीने ७९ धावांची खेळी केली. त्याशिवाय बेन डकेट २७, ओली पॉप ११, जो रुट २६, जॉनी बेअरस्टो २९ , बेन स्टोक्स आणि टॉप हार्टले यांना मोठी खेळी करण्यात अपयश आले. कुलदीप यादवने १५ षटकात ७२ धावांच्या मोबदल्यात पाच विकेट घेतल्या. तर रवींद्र जाडेजानं १० षटकात १७ धावा खर्च करत एक विकेट घेतली. जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज यांनीही भेदक मारा केला. त्यांना विकेट मिळवण्यात अद्याप अपयश आलेय. आर. अश्विन यानं ११.४ षटकात ५१ धावांच्या मोबदल्यात ४ विकेट घेतल्या.सलामी फलंदाज जॅक क्रॉऊली यानं फक्त भारतीय गोलंदाजांचा प्रतिकार केला. जॅक क्राऊली यानं ७९ धावांची खेळी केली. जॅकचा अपवाद वगळता इंग्लंडच्या एकाही फलंदाजाला ३० धावसंख्या पार करता आली नाही. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडची सुरुवात संयमी झाली.

### जॅक क्रॉली यानं संघर्ष केला

, पण कुलदीप यादव यानं भेदक मारा करत इंग्लंडच्या फलंदाजीला सुरुंग लावला. बेन डकेट आणि जॅक क्राऊली यांनी ६४ धावांची सलामी दिली. ही जोडी धोकादायक ठरते की काय असं वाटत होतं. पण कुलदीप यादवनं १८ व्या षटकात बेन डकेट याचा अडथळा दूर केला. बेन डकेट याचा शुभमन गिल यानं अप्रतिम झेल घेतला. डकेट बाद झाल्यानंतर इंग्लंडची फलंदाजी ढेपाळली. धर्मशाला कसोटी सामन्यात युवा शुभमन गिल यानं शानदार फिल्डिंग केली. शुभमन गिल यानं घेतलेल्या झेलचं सर्वच स्तरावर कौतुक होत आहे. शुभमन गिल यानं अप्रतिम झेल घेत इंग्लंडच्या डावाला सुरुंग लागला. १८ व्या षटकांपर्यंत भारताला विकेट मिळत नव्हती, बुमराह अन् सिराज यांनी खूप प्रयत्न केले. पण इंग्लंडच्या फलंदाजांनी चिवट फलंदाजी केली. पण कुलदीपच्या चेंडूवर अखेर शुभमन गिल यानं बेन डकेट याचा अप्रतिम झेल घेतला.प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडला पहिला धक्का १८ व्या षटकात बसला. कुलदीप यादवच्या चेंडूवर बेन डेकेट तंबूत परतला. कुलदीपचा चेंडूवर मोठा फटका मारण्याचा बेन डकेट यानं प्रयत्न केला. पण चेंडू हवेत उडाला... सर्कलमध्ये फिल्डिंग करणाऱ्या शुभमन गिल यानं धाव घेत बेन डकेट याचा अप्रतिम झेल घेतला. बेन डकेट याची खेळी संपुष्टात आणली.

# इंडियाकडून अश्विनला गार्ड ऑफ ऑनरने सन्मानित

## अश्विन याच्यासाठी हा अखेरचा कसोटी सामना खास आहे

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील अखेरच्या कसोटी सामन्याला धर्मशालाच्या मैदानावर सुरुवात झाली. इंग्लंडच्या बेन स्टोक्स यानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. आर. अश्विन याच्यासाठी हा अखेरचा कसोटी सामना खास आहे. कारण हा कसोटी त्याच्या करिअरमधील १०० वा सामना असेल. सामन्यापूर्वी बीसीसीआयकडून आर. अश्विन याचा विशेष सन्मान करण्यात आला. राहुल द्रविड याच्याकडून त्याला सम्मानित करण्यात आले.**



राहुल द्रविडने अश्विनला खास कॅप दिली. यावेळी अश्विनची पत्नी आणि दोन मुली उपस्थित होत्या. आर. अश्विन याला पत्नीने प्रत्येक टप्प्यात मानसिक साथ दिली. अनेकदा अश्विनचं मनोबल वाढवलं. आर. अश्विन यानं अनेक जाहीर कार्यक्रमात पत्नीचं कौतुक केलेय. आर. अश्विन याच्या पत्नीचं नाव प्रिति नारायण आहे. तिचा जन्म २६ मे १९८८ रोजी तामिळनाडूच्या चेन्नईमध्ये झाला. बी. टेक पर्यंत त्यांचं शिक्षण झालेय.अश्विन आणि प्रिति नारायण यांचं लग्न १३ नोव्हेंबर २०११ मध्ये झालं. त्याआधीच काही दिवसांपूर्वी अश्विन यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. अश्विन आणि प्रिति यांनी चेन्नईच्या पद्मा शेषाधरी बाला भवन शाळेत एकत्र शिक्षण घेतलेय. त्यांची पहिली भेट शाळेतच झाली होती. अश्विनच्या पत्नी कोणताही व्यावसाय करत नाही अथवा वेगळ्या प्रोफेशनमध्ये नाही. त्या गृहिणी आहे. त्यांना अनेकदा स्टेडियममध्ये अश्विनला सपोर्ट करताना कॅमेऱ्यात कैद झाल्या आहेत. अश्विन आणि प्रिति यांना दोन मुली आहेत. एकीचं नाव अकिरा आहे, तिचा जन्म २०१५ मध्ये झाला होता. तर दुसऱ्या मुलीचं नाव आध्या असं आहे.

### अश्विनला दिली गेली खास कॅप

धर्मशालाच्या मैदानात अश्विन आपल्या कसोटी कारकिर्दीतील १००वा सामना खेळण्यासाठी मैदानात आला. त्यावेळी टीम इंडियाच्या खेळाडूंनी त्याला गार्ड ऑफ ऑनर दिला गेला. भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि माजी दिग्गज फलंदाज राहुल द्रविड याने अश्विनला १०० कसोटी सामने पूर्ण केल्यानिमित्त खास कॅप दिली गेली. यावेळी अश्विनचे कुटुंब मैदानात उपस्थित होते. त्याची पत्नी प्रीती आणि दोन्ही मुली अश्विनकडे पाहताना दिसल्या. या चौघांचा सोबतचा फोटोही सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यातील अखेरच्या कसोटी सामन्याला धर्मशालाच्या मैदानावर सुरुवात झाली. इंग्लंडच्या बेन स्टोक्स यानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.